दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ७९ रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# राज्य सरकारकडून शिष्यवृत्ती योजनेत १५ वर्षांनी मोठा बदल

पुणे : राज्यातील अनुसूचित जातींतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजनेतून वगळून केंद्र सरकारची पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या योजनेची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा जास्त असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे योजना सुरू झाल्यानंतर सुमारे १५ वर्षांनी हा बदल करण्यात आला आहे. आदिवासी विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. जिल्हा परिषदेच्या शाळांतील इयत्ता पहिली ते दहावीत शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सन २०१०-२०११ पासून आदिवासी विकास विभागातर्फे सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येते. तसेच आदिवासी विकास विभागामार्फत चालवण्यात येत असलेल्या वसतिगृहांतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शालेय गणवेश, स्वच्छता प्रसाधने, शालेय साहित्य यासाठी निधी दिला जातो. सन २०१२पासून केंद्र शासनामार्फत इयत्ता नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांसाठी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. मात्र, राज्याची योजना आणि केंद्र सरकारची योजना यांची तुलना केली असता, केंद्र सरकारच्या योजनेतील शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेच्या रकमेपेक्षा अधिक आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती योजनेतून इयत्ता नववी, दहावीवगळून त्यांना केंद्र शासनाची पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय ३ सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नव्या निर्णयानुसार, अनुसूचित जमातींतील इयत्ता नववी, दहावीच्या सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र शासनाची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येत आहे. या योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासन यांचा हिस्सा ७५:२५ असा आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून निधी मिळाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात येईल. शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या नववी, दहावीच्या मुला-मुलींसाठी केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ देऊन या योजनेत उपलब्ध होणारी रक्कम वगळून राज्य शासनाच्या वसतिगृह योजनेतील उर्वरित रक्कम राज्य शासनाच्या योजनेतून संबंधित विद्यार्थ्यांना देण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना दिल्या जातील. मात्र, ही योजना अनुदानित, शासकीय निवासी आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातींतील मुला-मुलींना लागू राहणार



नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. सरकारवरील आर्थिक भार कमी राज्य शासनाकडून शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या पूर्व माध्यमिक योजनेत नमूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम आणि सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींना केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ देऊन या योजनेत उपलब्ध होणारी रक्कम वगळून उर्वरित रक्कम राज्य शासनाच्या योजनेतून देण्यात आल्यास राज्य शासनावरील आर्थिक भार कमी होईल. निर्वाह भत्ता योजनेत शिल्लक राहणारी रक्कम इतर शैक्षणिक कारणांसाठी वापरता येऊ शकते, असेही नमूद करण्यात आले आहे.

## कुंबेफळ येथे महिलांच्या आरोग्य तपासणीने भरपावसात स्वस्थ नारी सशक्त परिवार मोहीम यशस्वी

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील कुंबेफळ येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत कार्यालय कुंबेफळ व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवा निमित्त गावातील महिलांची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले शिबिरात महिलांनी मोठ्या संख्येने आरोग्य तपासणी करून घेतली स्वस्थ नारी सशक्त परिवार ही मोहीम यशस्वी झाली. या शिबिरामध्ये स्त्री रोग तज्ञ डॉ. योगेश्वरी थोरात व युसूफवडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.सुमित्रा नागरे यांनी महिलांची आरोग्य तपासणी करत महिलांना मार्गदर्शन केले. महिलांचे आरोग्य म्हणजे स्त्रियांच्या संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि भावनिक कल्याणाचा विचार करणे होय, ज्यामध्ये मासिक पाळी, गर्भधारणा, रजोनिवृत्ती आणि स्त्रीरोगविषयक समस्या तसेच हृदयरोग आणि मधुमेह या सारख्या महिलांमध्ये भिन्न पद्धतीने परिणाम करणाऱ्या आजारांचा समावेश होतो. महिलांच्या आरोग्यासाठी योग्य आहाराबरोबरच नियमित व्यायाम आणि वार्षिक आरोग्य तपासण्या महत्त्वाच्या आहेत, व सद्यस्थिती मध्ये घर सांभाळत सांभाळत महिला भगिनी आपले लहान मोठे आजार हे अंगावरच काढताना दिसून येत आहे. परंतु कालांतराने हे आजार शरीरावर विपरीत परिणाम करतात म्हणून महिलांनी वेळीच आपली नियमित तपासणी करणे गरजेचे आहे असे



केज येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ.योगेश्वरी थोरात यांनी व्यक्त केले.

शिबिरात किशोरवयीन मुलींच्या व महिलांच्या हिमोग्लोबिन, थायरॉईड, मधुमेह, रक्तदाब ई तपासण्या करण्यात आल्या.

शिबिर यशस्वी करण्यासाठी कुंबेफळ गावचे सरपंच व त्यांची टिम आणि प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका व ग्रामपंचायत च्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मुंब्र्यात सहायक पोलीस उपनिरीक्षकाला २५ हजारांची लाच घेताना अटक, दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी मागितली लाच

ठाणे : मुंब्रा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करतो असे सांगून २५ हजारांची लाच स्विकारल्याप्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक शशिकांत लक्ष्मण भालेराव याला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. त्याने ५० हजारांची लाच मागितली होती, तडजोडीअंती २५ हजार रुपये घेतल्याचे पोलिसांनी सांगितले.

मुंब्रा पोलीस ठाण्यात सहायक पोलीस उपनिरीक्षक शशिकांत लक्ष्मण भालेराव ( ४९ ) यांची नेमणूक आहे. त्यांच्याविरुद्ध मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रारदार यांच्याविरोधात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात मदत करतो असे सांगून सहायक पोलीस उपनिरीक्षक भालेराव यांनी त्याच्याकडे ५० हजारांची लाच मागितली होती.



तडजोडीनंतर ही मागणी २५ हजार रुपयांवर आली. २४ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांनी ही लाच मागितली होती. याबाबत तक्रारदार यांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २५ सप्टेंबर रोजी झालेल्या पडताळणीत भालेराव यांनी ही मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर २६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १३.१५ वाजता, मुंब्रा पोलीस ठाण्यामधील रायटर कक्षामध्ये तक्रारदाराकडून २५,००० रुपये स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवगज पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुहास शिंदे आणि भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, भ्रष्टाचारासंबंधी कोणतीही माहिती किंवा तक्रार असल्यास विभागाशी तात्काळ संपर्क साधावा.

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा डॉ.आंबेडकर मेडिकल अल्युमिनी असोसिएशनच्या वतीने सत्कार

लातूर : नुकताच लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्राप्त राज्याचे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा सत्कार केल्याबद्दल डॉ. आंबेडकर मेडिकल अल्युमिनी असोसिएशन, लातूर यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रकांत शिरोळे हे तर यावेळी लातूर जिल्ह्यातील वैद्यकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणारी नामांकित मंडळी यामध्ये डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. विजय अजनीकर, डॉ. सुनील होळीकर, डॉ. किरण होळीकर, डॉ हरिदास, डॉ सचिन जाधव, डॉ.अभिजित बनसोडे, डॉ.अंबादास कारेपूरकर उपस्थित होते. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना आ. संजय बनसोडे म्हणाले की हा पुरस्कार म्हणजे माझ्या वैयक्तिक यशापेक्षा समाजाच्या सर्व घटकांचे यश आहे. हा पुरस्कार मी लोकांना समर्पित करतो.




समाजातील सर्व घटकांनी सुख-दुःखात एकत्र येत रहावे, समाजाच्या मूळ प्रवाहात दुर्बल घटकांना आणण्यासाठी शिकलेली व समृद्ध मंडळी सतत पुढाकार घ्यावा, हेच माझे ध्येय आहे असे सांगून समाजाच्या शिकलेल्या व्यक्तींनी गरीब, वंचित आणि पुढील पिढ्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. डॉक्टर समाजातील एक संवेदनशील घटक असून सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक कार्यातही सहभाग घ्यावा. दर महिन्याला समाजाच्या बांधणीसाठी असे संमेलन आयोजित करून समाजातील ऐक्य बळकट व्हावे. असे आवाहन केले. याप्रसंगी डॉ अजय ओव्हाळ, डॉ सुनील होळीकर, डॉ महेंद्र सोनवणे, डॉ हरिदास, डॉ. किणीकर, डॉ देवनीकर, डॉ. बनसोडे यांनी आपले मनोगत मांडले. प्रास्ताविक डॉ. विजय अजनीकर तर आभार डॉ. सचिन जाधव यांनी मानले.यावेळी डॉ. सदानंद कांबळे, डॉ. सी. टी. कांबळे, डॉ. भारती, डॉ. चावडा, डॉ. अभिजित बनसोडे, डॉ. महेंद्र सोनवणे, डॉ. संकेत, डॉ. जगदीश, डॉ. हंसराज कांबळे, डॉ. अतुल लातूरकर, डॉ. आशिष सरवदे, डॉ. रवींद्र भालेराव, डॉ. रवींद्र सोनकांबळे, डॉ. सोमवंशी. उपस्थित होते.

## आता हर्षवर्धन पाटलांची जबाबदारी वाढली! 'या' बालेकिल्ल्यात सत्ता आणण्यासाठी शरद पवारांनी टाकला मोठा डाव

एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकाकडे पाहिले जात होते. पण २०१७ च्या महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आणि सत्ताबदल होऊन या महापालिकेवर भाजपची सत्ता आली. त्यानंतरच्या काळात राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडली. अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी असा पक्ष विभागला गेला. आता महापालिका निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने दोन्ही राष्ट्रवादी पक्षांकडून जोरदार तयारी केली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष लक्ष या महापालिकेवर आहे. नुकताच अजित पवार यांनी दोन दिवसांच्या दौरा केला. शरद पवार यांनी देखील पिंपरी चिंचवडमध्ये निवडणुकीसंदर्भात आढावा बैठक घेतली. अशातच शरद पवार यांनी मोठा डाव टाकला असून माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. पिंपरी चिंचवड शहराची जबाबदारी त्यांनी पाटील यांना दिली असून त्यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याची जबाबदारी असणार आहे.

पिंपरी चिंचवडचा विचार केला असता येथे तीन विधानसभा क्षेत्र आहेत. यामध्ये पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या विधानसभा क्षेत्रांचा समावेश होतो. आता शरद पवार यांनी हर्षवर्धन पाटील यांच्यावर निवडणुकीच्या अनुषंगाने जबाबदारी सोपवली असली तरी त्यांच्यासमोर मोठी आव्हानही असणार आहेत.

यांचे कारण म्हणजे अजित गव्हाणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली असून ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत दाखल झाले आहेत.

## लातूर जिल्हाधिकारी व तहसीलदारांकडून चांडेश्वर, पेठ नदीपात्राची पाहणी





लातूर :- जिल्हाधिकारी सौ. वर्षा वर्षा ठाकूर - घुगे व तहसीलदार श्री. सौदागर तांदळे यांनी शनिवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी चांडेश्वर, पेठ परिसरातील नदीवरील वाढलेल्या पाण्याची पातळी पाहणी केली. सतत सुरू असलेल्या पावसामुळे नदीपात्रात पाण्याचा जोर वाढला असून परिस्थितीची माहिती घेऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने ही पाहणी करण्यात आली. यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच नागरिकांनी नदीपात्राजवळ जाण्याचे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले.

## जि.प.प्रा.शाळा जयपूर शाळेतील शिक्षिका सौ.सच्चीता दिक्षीत यांना निरोप

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील जयपूर (सावळेश्वर) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षीका सौ.दिक्षीत यांची आंबाजोगाई येथे बदली झाल्यामुळे जयपूर शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांनी, गावकऱ्यांच्या वतीने निरोप देऊन सत्कार करण्यात आला. जयपूर येथे बदलून आलेल्या शिक्षिका अर्चना होके यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सावळेश्वर गावचे सरपंच मारूती कांबळे, प्रमूख पाहूणे आनंदगाव येथील शिवाजी पोळ उपस्थित होते. सौ.सचीता दिक्षीत यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या या शाळेत काम करतांना सर्व स्टाफ विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले, असे भावनिक उद्गार काढून याबद्दल मी सर्वांची आभारी आहे, प्रमुख



पाहुणे यांनी प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी या लहाण मुलांना घडविण्याचे काम प्राथमिक शिक्षकच करतात, अध्यक्ष पदावरून शिवाजी पोळ यांनी मत व्यक्त केले. सरपंच मारूतराव कांबळे यांनी सौ. दिक्षीत मॅडम यांनी गेली सात वर्षे या शाळेत ज्ञान दानाचे उत्तम काम तन मन धनाने केलेले आहे, घरोघरी पालकांशी संपर्क साधून विद्यार्थीस शिक्षकांची संधी उपलब्ध करून दिली, यांबाबत सौ.दिक्षीत यांनी उत्तम काम केल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास बालवाडी शिक्षिका आदी स्टाफ उपस्थित होता, कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व आभार श्री थोरात यांनी मानले, यावेळी नुकत्याच रुजू झालेल्या शिक्षिका शिक्षिका सौ.होके अर्चना यांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमास पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## ‘अर्थव्यवस्थेचे इंजिन’ धावायचे तर...

डॉ. जयंतीलाल भंडारी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) हे आज अर्थव्यवस्थेच्या मजबूत इंजिनप्रमाणे काम करत आहेत. त्यामुळे विकासाची गाडी अव्याहत धावण्यासाठी एमएसएमईंना सातत्याने सहकार्य, प्रशिक्षण आणि तांत्रिक मदत देणे आवश्यक आहे. त्याचसोबत एमएसएमई क्षेत्राने नवोन्मेष, स्पर्धा, क्षमता विकास आणि संशोधनाच्या दिशेनेही वाटचाल करणे आवश्यक आहे. सध्या प्रकाशित होत असलेल्या विविध अहवालांमध्ये ही टिप्पणी केली जात आहे की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्माण केलेल्या टॅरिफ आव्हानांच्या दरम्यान भारताने २०२७ पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्यासाठी आणि २०४७ पर्यंत विकसित देश होण्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेची कणा मानल्या जाणार्या एमएसएमई क्षेत्रातील विविध आव्हानांचे निराकरण करून त्याला सक्षम बनवणे अत्यावश्यक आहे. याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. किंबहुना, केंद्र सरकारने याची दखल यापूर्वीच घेतली. नुकत्याच झालेल्या जीएसटी परिषदेच्या ५६ व्या बैठकीत वस्तू व सेवा कर (जीएसटी) दर कमी केले आणि ते अधिक सुसंगत बनवण्यामागेही या क्षेत्राचा विचार आहे. जीएसटी सुधारणांमुळे ट्रम्प यांच्या टॅरिफच्या आव्हानांचा सामना करणार्या एमएसएमईंना मोठा फायदा होणार आहे.

एमएसएमई क्षेत्राशी संबंधित जीएसटी सुधारणांचा थेट फायदा ऑटोमोबाईल, ड्रायफ्रूटस्, खाद्य प्रक्रिया, दुग्धजन्य पदार्थ, परिधान, लॉजिस्टिक्स, हस्तकला आणि बांधकाम साहित्य उद्योगांना होणार आहे. जीएसटी दर कमी करण्याच्या या धोरणामुळे पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल. स्थानिक उत्पादनाला चालना मिळेल आणि विशेषतः महिला, ग्रामीण उद्योजक व असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी रोजगार वाढतील. यामुळे वस्त्रोद्योग, खेळणी, हस्तकला, चामडे आणि इतर अनेक क्षेत्रांत रोजगाराच्या संधी वाढतील. दोन चाकी वाहने, कार, बस व ट्रॅक्टरवर कमी जीएसटी आकारला गेल्याने मागणी वाढेल आणि त्यामुळे टायर, बॅटरी, काच, प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक्सशी निगडित एमएसएमईंना फायदा होईल. ट्रॅक्टरवरील जीएसटी ५ टक्क्यांपर्यंत (१८०० सीसी) कमी केल्याने भारताला जागतिक स्तरावर ट्रॅक्टर उत्पादनात अग्रणी होण्याची संधी मिळेल व संबंधित एमएसएमईंना प्रोत्साहन मिळेल. व्यावसायिक माल वाहतूक वाहने (ट्रक, डिलिव्हरी व्हॅन) यांवरील जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के केल्याने वाहतूक खर्च कमी होईल. लॉजिस्टिक्स खर्च कमी होतील. महागाईचा दबाव कमी होईल आणि एमएसएमईंना याचा मोठा फायदा होईल.

जीएसटीच्या नव्या स्लॅबमुळे सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यापारी व एमएसएमईंना दिलासा मिळणार आहे. सामान्य माणसाच्या वापरातील वस्तू असोत, शेतकर्यांशी निगडित उत्पादनं असोत, मध्यमवर्गाशी संबंधित वस्तू असोत किंवा शिक्षण, आरोग्य, विमा यासारखे क्षेत्र असो, प्रत्येक क्षेत्रातील एमएसएमईंना मिळालेली जीएसटी सूट अर्थव्यवस्थेला गती देणार आहे. जीएसटी दरात कपात झाल्याने एमएसएमईंना कर सवलत मिळेल, हे खरे असले, तरी त्यांच्यासमोर अजूनही काही आव्हाने आहेत. डिजिटल पायाभूत सुविधा, कुशल मजूर, बाजारपेठेतील पोहोच, निधीअभाव, तंत्रज्ञान, पुरवठा साखळी, डेटा सुरक्षा व कौशल्य विकास यांसारख्या आव्हानांचा डोंगर आहे. आयटी क्षेत्रातील स्टार्टअप्ससमोर व्यावहारिक मार्गदर्शन, ॲक्सेस आणि सुरुवातीच्या गुंतवणुकीची अडचण आहे. खाद्य प्रक्रिया उद्योगांमध्ये निकृष्ट तंत्रज्ञान व कमकुवत लॉजिस्टिकमुळे दर्जात्मक अडचणी आहेत. ऊर्जा पुरवठ्यातील अनियमितता आणि मोठ्या कंपन्यांकडून होणार्या पेमेंटमध्ये होणारा विलंब हा एमएसएमई विकासातील मोठा अडथळा आहे.

ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे निर्माण झालेल्या चिंतांचा निपटारा करण्यासाठी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात एमएसएमई क्षेत्राला बळकटी देण्यासाठी बहुआयामी उपाययोजना जाहीर केल्या आहेत. या उपाययोजनांमध्ये वित्तीय मदत, खरेदी धोरणे, क्षमता निर्माण, बाजार एकत्रीकरण यांसह उद्योजकता प्रोत्साहनासाठी उद्यम नोंदणी पोर्टल, पीएम विश्वकर्मा योजना, पीएमईजीपी, स्फूर्ती आणि एमएसईसाठी सार्वजनिक खरेदी धोरण यांचा समावेश आहे. उद्योगांचा विस्तार आणि कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी एमएसएमई वर्गीकरणातील गुंतवणूक व टर्नओव्हर मर्यादा वाढवली आहे. चालू आर्थिक वर्षात (२०२५-२६) एमएसएमईंना दिल्या जाणार्या कर्जाचे लक्ष्य मागील वर्षाच्या तुलनेत जवळपास २० टक्क्यांनी वाढवले. सरकार निर्यातदारांना पाठबळ देण्यासाठी २,२५० कोटी रुपयांच्या निर्यात संवर्धन मोहिमेला गती देत आहे आणि तारणाशिवाय कर्ज उपलब्ध करून देण्याची दिशा घेत आहे. टॅरिफच्या या वादळात एमएसएमईंच्या क्षमतांचा विकास, कार्यपद्धती सुव्यवस्थित करणे आणि निर्यातीतील धक्क्यांचा मुकाबला करण्यासाठी एमएसएमईंना धोरणात्मक सहाय्याची गरज आहे. एमएसएमईंच्या प्रोत्साहनासाठी व्यवसाय सुलभता, जागतिक बाजारपेठेत सुलभ प्रवेश, अनुपालनाचा भार कमी करणे आणि जीएसटी दरातील सोपेपणा यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. एमएसएमईंना थेट मदत तसेच प्रक्रियेद्वारे मदत या दोन्ही मार्गांनी आधार देणे आवश्यक आहे, ज्यामुळे त्यांच्या एकूण संरचनेत लवचिकता येईल आणि अनुपालन खर्च कमी होईल.

सरकारने एमएसएमईंचा व्यवसाय अधिक सोपा करणे आणि देशांतर्गत खप वाढवणे, यावर नव्याने लक्ष द्यायला हवे. नव्या पुरवठा साखळ्या आणि नवे बाजार शोधणे आवश्यक आहे. परदेशी गोदामांची सुविधा आणि जागतिक ब-ँडिंग उपक्रमांमुळे निर्यात बाजार वाढेल. पायाभूत सुविधांची मजबुती, अधिक लॉजिस्टिक सुविधा, कमी व्याज दरावर कर्ज उपलब्ध करून देणे, व्याज समतुल्य योजना पुन्हा सुरू करणे आणि कर्ज हमी कार्यक्रमांचा विस्तार करणे या उपायांनी एमएसएमईंना आर्थिक स्थिरता मिळेल. उत्पादन- लिंक्ड प्रोत्साहन (पीएलआय) योजनांचा विस्तार केल्याने विशेषतः निर्यातमुखी एमएसएमईंना मोठा लाभ होईल. नवोन्मेषाची नवी लाट एमएसएमईंसाठी एक नवे पर्व लिहू शकते. भारतातील एमएसएमईंनी गुणवत्ता हाती घेऊन आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारले, तर ते जागतिक बाजारपेठेत आपली स्पर्धात्मक शक्ती धोरणात्मकदृष्ट्या वाढवू शकतील. कारण, एमएसएमई हे अर्थव्यवस्थेचे मजबूत इंजिन आहेत आणि या विकासाला टिकवण्यासाठी त्यांना सतत सहकार्य, प्रशिक्षण व तांत्रिक मदतीची गरज आहे. त्याचबरोबर ट्रम्प टॅरिफच्या सत्याला लक्षात घेऊन एमएसएमईंनी नवोन्मेष, स्पर्धा, क्षमता विकास आणि संशोधनाच्या दिशेने सज्ज व्हायला हवे. भारताचा शाश्वत विकास केवळ याच मार्गाने शक्य आहे.

# लडाखचे आंदोलन : स्वायत्ततेची मागणी आणि घटनात्मक संरक्षणाचा प्रश्न

लडाख हे भारतातील अत्यंत महत्त्वाचे व संवेदनशील क्षेत्र. उंच पर्वतरांगा, कठीण हवामान, लष्करी दृष्ट्या धोरणात्मक स्थान, तसेच सांस्कृतिक विविधता यामुळे लडाखची ओळख वेगळी ठरते. २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरमधून लडाखला वेगळे करून केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. तेव्हा जनतेमध्ये अपेक्षा होत्या की विकासाच्या दृष्टीने नवे अध्याय सुरू होतील. परंतु गेल्या काही वर्षांपासून लडाखमध्ये असंतोष वाढत आहे. अलीकडेच लेह येथे झालेल्या आंदोलनाने उग्र रूप धारण केले आणि पुन्हा एकदा राज्याचा दर्जा तसेच भारतीय राज्यघटनेतील सहाव्या अनुसूचीत




समावेश या मागण्या प्रखरपणे पुढे आल्या. अनुच्छेद २४० अंतर्गत लडाखचे प्रशासन लडाखकडे स्वतःची विधानसंस्था नाही. त्याचे प्रशासन अनुच्छेद २४० अंतर्गत राष्ट्रपतींच्या अधिसूचनांवर चालते. या अधिसूचनांमध्ये काही लोकाभिमुख तरतुदी नक्की आहेत – जसे की १५ वर्षांचा वास्तव किंवा सात वर्षांचे स्थानिक शिक्षण यावर आधारित स्थायिक प्रमाणपत्र; ८५ टक्के आरक्षण अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गासाठी; अधिकृत भाषांमध्ये इंग्रजी, हिंदी, उर्दू, भोटी व पर्गीचा समावेश; तसेच लेह आणि कारगिल हिल कौन्सिलमध्ये महिलांसाठी एकतृतीयांश जागा राखीव. मात्र या सर्व तरतुदी फक्त कार्यकारी आदेश आहेत. कोणत्याही क्षणी त्यात बदल होऊ शकतो. त्यांना संविधानिक स्थैर्य नाही. हीच परिस्थिती आज लडाखवासीयांच्या असुरक्षिततेचे मूळ कारण आहे. लोकशाहीतील तूट आणि संविधानिक असुरक्षितता लडाखमध्ये विधानसभेचा अभाव ही मोठी पोकळी आहे. लोकप्रतिनिधींना धोरणनिर्मितीत थेट सहभाग नसल्यामुळे निर्णय प्रक्रिया केंद्रीकृत झाली आहे. स्थानिक जनता व आदिवासी समुदायांचे प्रश्न न थेट संसदेत पोहोचतात, न स्थानिक पातळीवर त्यांचे कायदेशीर निराकरण होते. अनुच्छेद २४० अंतर्गत निघालेले आदेश हे तात्पुरते आहेत, तर सहावी अनुसूची आदिवासी परिषदांना कायमस्वरूपी कायदेशीर अधिकार देते. आसाम, मेघालय, त्रिपुरा, मणिपूर या राज्यांत आदिवासी परिषदांना सहाव्या अनुसूचीनुसार संरक्षण आहे. मग ९७ टक्के अनुसूचित जमाती लोकसंख्या असलेल्या लडाखला हे संरक्षण का मिळू नये, हा सवाल स्थानिक जनता विचारते. जमीन, पर्यावरण आणि पर्यटन लडाखच्या अद्वितीय भौगोलिक रचनेमुळे येथे जमीन व पर्यावरणाचे प्रश्न फार संवेदनशील आहेत. बाहेरील लोकांकडे जमीन विक्रीवर कोणतेही कायदेशीर निर्बंध नसल्याने स्थानिक लोकांमध्ये भीती आहे की पर्यटन व्यवसायाच्या आडून जमीन हस्तांतरण वाढेल. त्यातून स्थानिक नियंत्रण कमी होईल आणि नाजूक पर्यावरण धोक्यात येईल. सियाचेन हिमनदी, उमलिंगला, झंस्कार खोरे यांसारखी ठिकाणे जगप्रसिद्ध आहेत. मात्र पर्यटनावर नियंत्रण नसल्यास पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, जैवविविधतेचा ऱ्हास यासारखे धोके निर्माण होतात. त्यामुळे जमिनीचे व पर्यावरणाचे रक्षण ही स्थानिक लोकांची प्रामाणिक चिंता आहे. बेरोजगारी व रोजगाराचे प्रश्न लडाखमध्ये शिक्षण घेतलेले तरुण मोठ्या संख्येने बेरोजगार आहेत. पदवीधर बेरोजगारी दर तब्बल २६.५ टक्के इतका आहे. सार्वजनिक सेवा आयोगच नसल्याने स्थानिक तरुणांना प्रशासकीय सेवेत प्रवेशाची संधी मर्यादित आहे. आरक्षणाच्या तरतुदी असूनही नोकऱ्यांचे प्रमाण कमी असल्याने असंतोष वाढतो. लडाखमध्ये हरित ऊर्जा, पर्यटन, पायाभूत सुविधा या क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. परंतु त्याचा फायदा स्थानिक युवकांना मिळेल अशी ठोस यंत्रणा तयार झालेली नाही. रोजगार निर्मिती ही आंदोलनामागील महत्त्वाची मागणी आहे. सांस्कृतिक ओळखीचे रक्षण भोटी व पर्गी या स्थानिक भाषांना मान्यता दिली असली तरी शिक्षणव्यवस्था व शासनात त्यांचा वापर फारसा होत नाही. परिणामी भाषेचे व संस्कृतीचे संवर्धन बाधित होत आहे. लडाख हा बौद्ध-मुस्लिम संगम आहे. स्थानिक भाषांचे शैक्षणिक व प्रशासकीय महत्त्व वाढवले नाही तर सांस्कृतिक अस्मिता धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली जाते. लडाखचे धोरणात्मक व भौगोलिक महत्त्व लडाखचे स्थान भारताच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पाकिस्तान व चीन या दोन्ही देशांच्या सीमेला लागून असल्याने येथे लष्करी तैनाती कायम असते. लेह हा भारतातील क्षेत्रफळानुसार दुसरा मोठा जिल्हा आहे. कारगिल जिल्ह्यातील झंस्कार खोरे हे नियंत्रण रेषेजवळ आहे. भारताचा थंड वाळवंट म्हणून ओळखले जाणारे लडाख केवळ पर्यटनासाठीच नाही तर सौर ऊर्जा आणि भू-ऊर्जेच्या प्रचंड साठ्यासाठीही महत्त्वाचे आहे. त्यामुळे येथे विकासासोबत संवेदनशील पर्यावरणाचे संरक्षण करणे अत्यावश्यक ठरते. पुढील दिशा : कोणते उपाय आवश्यक? लोकशाही सक्षमीकरण – लडाखमध्ये विधानसभा स्थापन करणे किंवा हिल कौन्सिलना अधिक अधिकार देणे गरजेचे आहे. सहाव्या अनुसूचीत समावेश – जमीन, साधनसंपत्ती व आदिवासी ओळखीचे घटनात्मक संरक्षण मिळणे आवश्यक आहे.



रोजगार निर्मिती – सार्वजनिक सेवा आयोग स्थापन करणे, हरित ऊर्जा, पर्यटन व पायाभूत सुविधा क्षेत्रात स्थानिक युवकांना रोजगार देणे. संस्कृती व पर्यावरणाचे रक्षण – स्थानिक भाषांचा प्रशासनात समावेश, पर्यटनावर नियंत्रण, पर्यावरणपूरक विकासाची दिशा. निष्कर्ष लडाखमधील आंदोलन हे केंद्रीकृत प्रशासन व प्रादेशिक स्वायत्तता यांतील संघर्ष स्पष्टपणे दाखवते. ९७ टक्के अनुसूचित जमाती लोकसंख्या, नाजूक पर्यावरण व धोरणात्मक स्थान लक्षात घेता, लडाखला सहाव्या अनुसूचीनुसार घटनात्मक संरक्षण मिळणे हा न्यायाचा प्रश्न आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने केंद्रशासनाची भूमिका महत्त्वाची असली तरी लोकशाही, रोजगार, पर्यावरण व संस्कृती या स्थानिक आकांक्षा दुर्लक्षित करता येणार नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा आणि स्थानिक हक्क यामध्ये समतोल साधणारे संस्थात्मक सुधार हेच स्थैर्य व समावेशक विकासाची हमी ठरू शकतात. लडाखच्या रस्त्यांवर उठलेले आवाज केवळ आंदोलन नाहीत, तर ते भारताच्या संघराज्य रचनेतील एक गंभीर प्रश्न आहे – केंद्रशासनाचा अधिकार आणि प्रादेशिक स्वायत्ततेचा हक्क. याचे उत्तर घटनात्मक संरक्षण, लोकशाही सक्षमीकरण आणि शाश्वत विकास या तीन आधारस्तंभांत आहे.

*******

दादाराव कैलास तायडे. (बी. कॉम., एल एल.बी., एम. ए. (राज्यशास्त्र), सेट)

# २८ सप्टेंबर शहीद भगतसिंग जयंती

पाकिस्तान मधील पंजाब प्रांतातील बांगा गावांमध्ये २८ सप्टेंबर १९०७ ला भगतसिंग नावाचा क्रांतिकारक तेजस्वी तारा जन्माला आला आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश निर्माण झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात प्रज्वलित झाली आणि वयाच्या १४ व्या वर्षी स्वतंत्र लढ्यात उडी घेतली.भगतसिंग यांच्या आई-वडीलांनी भगतसिंग यांचे लग्न १९ व्या वर्षी करण्याचा विचार केला.परंतु त्यांनी लग्नास नकार दिला व घर सोडून निघून गेले आणि आपल्या आई-वडिलांकरीता एक पत्र लिहिले या पत्रात भगतसिंग लिहितात मेरा जीवन एक महान उद्देश के लिये समर्पित है और वह उद्देश देश की आजादी है इसलीये मुझे तबतक चैन नही है.ना ही मेरी ऐसी कोई सांसारिक सुख की इच्छा है. यावरून स्पष्ट झाले की त्यांच्या नसानसात स्वातंत्र्याची ज्वाला धकधकत होती. ८ एप्रिल १९२९ ला भगतसिंग यांनी आपले क्रांतीकारी मित्र बटुकेश्वर दत्त यांच्या सोबत दिल्लीतील सेंट्रल असेम्ब्लीवर बाँब टाकला व इंग्रजांना जबरदस्त धक्का दिला यामुळे संपूर्ण भारतात स्वातंत्र लढ्याचा आगास झाला.आज शहिदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे. अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलीदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली.त्यामुळे जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला.हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पहावले नाही.त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले.शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोण्हीही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.यामुळेच देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. यामुळे महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां व,गरीबी व सर्वसामान्यांचे हाल-बेहाल होतांना दिसते.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशवासीयांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्यान व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर ९५ टक्के राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती झाल्याचे दिसून येतात. भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांनी फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य आणि चांगला उपयोग करून जनसेवा केली पाहिजे.तेंव्हाच शहिद-ए-आजम भगतसिंग यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.त्यामुळे सावधान!राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी-कोटी प्रणाम शहिद भगतसिंग यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन व सामाजिक संस्था यांनी भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व झाडांच्या पानांत,फुलात, फळात आपल्याला शहिद भगतसिंग सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल.जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा शहिद भगतसिंग यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

***********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.

# सवलतीचा बोलबाला

देशात कालपासून नवीन जीएसटी स्लॅबची अंमलबजावणी सुरू झाली. त्यातून अनेक ग्राहक उपयोगी आणि जनसामान्यांच्या गरजेच्या वस्तू काही प्रमाणात स्वस्त झाल्या आहेत. हा बचत उत्सव असल्याचे मोदी सरकारचे म्हणणे आहे. अर्थात, एक गोष्ट खरी आहे की, या सरकारकडून जनतेच्या थेट उपयोगी पडेल अशी घोषणा बर्याच अवधीनंतर झाली आहे. केंद्र सरकारने १२ टक्के आणि २८ टक्के दराचे जीएसटी स्लॅब काढून टाकले, त्याऐवजी आता केवळ ५ टक्के आणि १८ टक्के या दोन दराचे स्लॅब कायम राहतील. अति महागड्या चैनीच्या वस्तू आणि सिगारेट, तंबाखू तसेच काही विशिष्ट प्रकारची पेय यांच्यावर मात्र तब्बल ४० टक्के दराने जीएसटी करवसुली सुरू राहणार आहे. सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थ यांचा उल्लेख सरकारने पापजन्य पदार्थ असा केला असून या पापजन्य पदार्थांवर हा ४० टक्क्यांचा कर लागू असेल. २८ टक्के दराने ज्यावर जीएसटी आकारला जात होता, अशा बहुतांश वस्तूवर आता १८ टक्के दराने आणि पूर्वी ज्या वस्तूंवर १८ टक्के दराने जीएसटी आकारला जात होता त्यावर आता १२ टक्के दराने जीएसटी आकारला जाईल. म्हणजेच त्या प्रमाणात विविध वस्तूंचे दर कमी होतील. छोट्या कार, दुचाकीपासून अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अन्य ग्राहक उपयोगी वस्तू त्यामुळे स्वस्त होतील. ही कमालीची स्वस्ताई असल्याचे सरकारकडून भासवले जात आहे, परंतु वस्तुस्थिती नेमकी तशीच आहे का यावर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. या निर्णयामुळे सर्वसामान्य कुटुंबाचे वर्षाला कमीत कमी ३० ते ४० हजार रुपये वाचतील, असा सरकारचा दावा आहे. सरकारी महसुलात या निर्णयामुळे किती तूट येईल यावरसुद्धा वेगवेगळे दावे सुरू आहेत. काही जणांच्या मते, या सवलतीमुळे जीएसटी महसुलात सुमारे ४० हजार कोटींची घट होईल तर काही जणांच्या मते ही घट एक लाख कोटी रुपयांच्या वर जाईल. २२ तारखेला नवरात्रीच्या सुरुवातीच्या दिवशी हा निर्णय लागू होणार असल्याने पंतप्रधान मोदी यांनी त्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी पाच वाजता देशाला संबोधित करून ही जीएसटी कपात म्हणजे नागरिकांसाठी ‘बचत उत्सव’ असल्याचे नमूद केले होते. त्यावर आता विरोधी पक्षांकडून वेगळी प्रतिक्रियाही उमटली आहे. जीएसटी कपात हा जर बचत उत्सव असेल तर गेली आठ वर्षे ज्या दराने लोकांकडून जीएसटी वसूल केला जात होता तो ‘लूट महोत्सव’ होता का, असा प्रश्न मोदी सरकारला विचारला जात आहे. मुळात जीएसटी ही संकल्पना सगळे कर रद्द करून एकच सुटसुटीत दराचा कर लागू करावा यासाठी अमलात आणली गेली होती. या जीएसटी करपद्धतीला नरेंद्र मोदी यांचा ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना विरोधच होता. जीएसटी करपद्धती देशात यशस्वीच होऊ शकत नाही असे त्यांचे वक्तव्य असलेले व्हिडिओ सध्या फिरत आहेत. अरुण जेटली यांनी तर यूपीए सरकार आणू इच्छित असलेल्या जीएसटी कर पद्धतीचा, टॅक्स टेररिझम असा उल्लेख केला होता. हा सगळा इतिहास आपण दुर्लक्षित करू, पण सरकारकडे सुरुवातीपासून जीएसटीची कररचना अधिक सोपी आणि कमीत कमी टप्प्यांची असावी असा जो आग्रह विरोधी पक्षांकडून विशेषतः काँग्रेसकडून धरला जात होता त्याकडे मोदी सरकारने सुरुवातीपासूनच दुर्लक्ष केले आणि तब्बल सुमारे आठ वर्षे पाच टप्प्यांतील स्लॅबनुसार लोकांकडून कर वसुली केली गेली ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. या करातून सरकारने जनतेचे सुमारे ५५ लाख कोटी रुपये लुटले अशी ही एक आकडेवारी पुढे केली जात आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारला उशिरा का होईना जाग आली याबद्दल त्यांचे अभिनंदनच करावे लागेल. पण हे करत असताना फार उर बडवून त्याचाही इव्हेंट करावा अशी ही परिस्थिती नक्कीच नाही. जीएसटी लागू करणे हा मोदी सरकारचा मास्टर स्ट्रोक आणि जीएसटीचे टप्पे कमी करणे हाही मोदी सरकारचा मास्टर स्ट्रोक अशी डबल ढोलकी, सरकारच्या कच्छपी लागलेल्या वाहिन्यांकडून सुरू आहे. त्यामुळे या स्लॅब कपातीला सरकार जर बचत उत्सव म्हणत असेल तर आतापर्यंत ज्या दराने जीएसटी करवसुली केली गेली त्याचा उल्लेख विरोधकांकडून लूट महोत्सव असाच केला जाणे स्वाभाविक आहे.

# राजा ढाले यांचे धम्म चळवळीतले योगदान

भारताच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात अनेक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांनी आपला ठसा उमटवला आहे. त्यात राजा ढाले हे नाव विशेषत्वाने घेण्यात येते. कारण त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांची मशाल हातात घेतली आणि धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण केला. समाजव्यवस्थेत शतकानुशतकं पसरलेल्या जात–अन्याय, विषमता आणि अमानवीय परंपरांविरुद्ध उभं राहण्याचं साहस दाखवणाऱ्या काही थोर व्यक्तींमध्ये राजा ढाले हे नाव सदैव अग्रक्रमाने घेतलं जाईल. ते केवळ एक विचारवंत, लेखक, कवी किंवा पत्रकार नव्हते; तर ते समाजमनाला हादरे देणारे, आत्मसन्मानाची जाज्वल्य जाणीव करून देणारे आणि बाबासाहेबांच्या धम्म चळवळीचे प्रखर वाहक होते.



जातिव्यवस्था ही भारतीय समाजाच्या विकासाला लागलेली गंज आहे. या व्यवस्थेविरुद्ध बोलण्याचं धाडस प्रत्येकाला होत नाही. पण राजा ढाले यांनी आपल्या लेखणीतून आणि संघर्षातून हा आवाज बुलंद केला. राजा ढाले यांनी १९७२ मध्ये स्थापन झालेल्या दलित पँथर संघटनेच्या माध्यमातून वंचित समाजाला हक्क आणि स्वाभिमानाची नवी भाषा दिली व चळवळ उभारून त्यांनी शोषित समाजात आत्मसन्मानाची ठिणगी पेटवली. तेव्हा ते तरुण होते; पण त्यांच्यातील प्रखर अस्मिता, जाज्वल्य आत्मसन्मान आणि अढळ धैर्याने संपूर्ण समाजात जागृती निर्माण केली. बाबासाहेबांनी दिलेला संदेश की शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवला.

राजा ढाले यांना नेहमीच बाबासाहेब आंबेडकर हे प्रेरणास्थान होते. आंबेडकरांनी दाखवलेला समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा मार्ग त्यांनी आयुष्यभर आपल्या कार्यातून जपला. ढाले यांच्यासाठी बुद्धांचे धम्म म्हणजे केवळ धार्मिक आचार नव्हता, तर तो सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांचा लढा होता. राजा ढाले यांचे लेखन व भाषणांतून नेहमीच धम्म मार्गाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी बुद्धांच्या करुणा, समता आणि मैत्रीच्या तत्त्वज्ञानाला सामाजिक क्रांतीचे अधिष्ठान मानले. त्यांचा ठाम विश्वास होता की खऱ्या अर्थाने मनुष्याची मुक्ती फक्त धम्माच्या मार्गानेच शक्य आहे. म्हणूनच त्यांनी आयुष्यभर जातिभेद, अंधश्रद्धा, असमानता याविरुद्ध आवाज उठवला आणि समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा झेंडा उंचावला.

पत्रकार, लेखक, विचारवंत म्हणून ढाले यांचे योगदान विलक्षण होते. त्यांनी सत्य मांडताना कधीही घाबरले नाही. त्यांच्या शब्दांत धार होती, त्यांच्या भूमिकेत ठामपणा होता. अन्यायाविरुद्ध उभं राहणं, अंधश्रद्धा फोडणं, आणि दुर्बलांच्या हक्कांसाठी झगडणं हेच त्यांचं जीवनकार्य ठरलं. राजा ढाले यांचे आयुष्य म्हणजे संघर्षाचा प्रवास होता. ते संघर्ष फक्त वैयक्तिक नव्हता, तर लाखो–करोडो दलित, शोषित, पीडितांसाठी होता. त्यांच्या अस्तित्वामुळे अनेकांना स्वतःच्या माणुसकीची किंमत कळली. अन्याय, अपमान, भेदभाव यांना न घाबरता लढणं म्हणजे काय, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिलं.


ढाले यांनी धम्म चळवळीला केवळ परंपरा म्हणून न जपत, तर एक जीवंत क्रांती म्हणून पुढे नेलं. त्यांनी दाखवलं की बुद्धांचा धम्म हा फक्त पूजाघरातला विषय नाही, तर तो समाज परिवर्तनाचं अधिष्ठान आहे. धम्म चळवळ ही केवळ बौद्ध धर्माची परंपरा नाही, तर ती सामाजिक परिवर्तनाची लढाई आहे. या लढाईला दिशा देणारे राजा ढाले होते. बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी नवी धार दिली, त्यात क्रांतिकारकता आणली. त्यांच्या कार्यामुळे धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्या विचारांनी असंख्य तरुणांना प्रेरणा दिली आणि धम्माच्या मार्गाकडे वळवलं.

आज राजा ढाले आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष आणि त्यांची ओजस्वी परंपरा आपल्याला सतत मार्गदर्शक ठरेल. धम्म चळवळीतला त्यांचा ठसा कायमचा अविस्मरणीय आहे. त्यांनी दाखवलेला आत्मसन्मानाचा मार्ग आणि बाबासाहेबांच्या तत्त्वांचा वारसा पुढे नेणं हीच खरी त्यांना दिलेली श्रद्धांजली ठरेल. समता, न्याय आणि धम्माचा संदेश जगभर पोहोचवणाऱ्या थोर विचारवंत राजा ढाले यांना वाढदिवसानिमीत्त मानाचा मुजरा!

********

प्रवीण बागडे,
नागपूर

# वय झाल्यानंतर पडणं कसं टाळाल?



वर्ल्ड कॉन्फेडरेशन ऑफ फिजिकल थेरपीने दिलेल्या आकडेवारीनुसार पडणं (षरश्रश्री) हे अनपेक्षित इजा होऊन मृत्यू होण्याचं दुसरं सर्वात मोठं कारण आहे. दरवर्षी सुमारे ३७.३ दशलक्ष लोकांना पडल्यामुळे इतकी गंभीर दुखापत होते की, त्यांना वैद्यकीय उपचार घ्यावे लागतात. विशेषतः ६० वर्षांवरील व्यक्तींमध्ये पडणं प्राणघातक ठरण्याचा धोका सर्वाधिक आहे. या आकडेवारीवरून स्पष्ट होतं की, वृद्ध व्यक्तींमध्ये पडणं ही केवळ किरकोळ गोष्ट नसून आरोग्यावर मोठा परिणाम करणारी समस्या आहे.

पडण्यामागची कारणं

वृद्ध व्यक्तींमध्ये पडण्याची अनेक कारण असू शकतात, काही कारण ही शारीरिक बदलांशी संबंधित असतात तर काही बाह्यघटक आणि वातावरणाशी संबंधित असतात. शारीरिक बदलांमध्ये स्नायूंचा आकार आणि कार्यक्षमता कमी होणे, हाडं ठिसूळ होणे, डोळे, कान आणि स्नायू यातली सुसूत्रता कमी होणे आदी घटक महत्त्वाचे ठरतात. काही वेळा विशिष्ट औषधांच्या साइड इफेक्ट्स मुळे चक्कर येऊ शकते. यासोबतच काही बाह्यघटक जसं गुळगुळीत फरशी, सैल गालिचे, जिन्याला रेलिंग नसणं, बाथरूममध्ये ग्रॅब बार्सचा अभाव, कमी किंवा अपुरा प्रकाश, चुकीची पादत्राणे वापरणं यासारखे घटक पडण्याची शक्यता वाढवतात.

आपला पडण्याचा धोका किती आहे हे कसं ओळखावं?

कमी धोका

लायकी असेल तर गाडीतून उतरवून दाखव रस्त्यात गाडी बंद पडताच महिलेने घातला गोंधळ; तखऊ्ज पाहून तुम्हीच सांगा चूक कोणाची?

तुमचं वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक आहे आणि तुम्ही आत्तापर्यंत कधीही पडलेले नसाल किंवा एकदाच किरकोळ पडलेले असाल आणि सद्यस्थितीत तुमची सुसूत्रता व चालणं हे नियमित असेल तर तुम्ही लोअर रीस्क फॉर फॉल्स मधे समाविष्ट होता.

मध्यम धोका तुमचं वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक आहे आणि तुम्ही एकदा पडलेले आहात किंवा तुम्हाला चालण्यात किंवा तोल सांभाळण्यात अडचण जाणवते आहे; तर तुम्ही मीडियम रीस्क फॉर फॉल्स मधे समाविष्ट होता.

जास्त धोका तुमचं वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक आहे, तुम्ही एकदा पडलेले आहात आणि पडण्यामुळे तुम्हाला दुखापत झालेली आहे, किंवा तुम्ही एका वर्षात २ पेक्षा अधिक वेळा तोल जाऊन पडला आहात. पडल्यानंतर तुम्हाला किमान एक तासापर्यंत मदतीशिवाय उठता आलेलं नसेल, दुखापत झाली असेल, तुम्ही बेशुद्ध झालेले असाल तर तुम्ही हाय रीस्क फॉर फॉल्स मधे समाविष्ट होता.

फिजिओथेरपीची भूमिका

फिजिओथेरपीस्ट पडण्याचा धोका तपासून व्यक्तीनुसार उपाययोजना करतात. ते पुढील गोष्टींची तपासणी करतात:

स्नायूंची ताकद, हालचाल आणि लवचिकता

चालताना किंवा दैनंदिन कामं करताना तोल किती राखता येतो

स्मरणशक्ती आणि विचारशक्ती

फिजिओथेरपिस्ट अनेकदा डॉक्टर, ऑक्युपेशनल थेरपिस्ट आणि इतर आरोग्यतज्ज्ञांसोबत मिळून काम करतात. याला मल्टीडीसीप्लिनरी पद्धत म्हणतात.

## थोडी तरी लाज बाळगा! धाराशिवमध्ये पुराचा हाहाकार, शेतकरी संकटात अन् जिल्हाधिकारी नाचण्यात दंग

मराठवाड्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. पावसाचा मोठा फटका बीड धाराशिव, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये बसला आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून घरे, जनावरे सर्व वाहून गेले आहे. एकीकडे शेतकरी मोठ्या संकटात सापडलेला असताना जिल्हाधिकाऱ्यांनी बेजबाबदार वर्तन केल्याचे समोर आले आहे. धाराशिव जिल्ह्यात पुराचा हाहाकार सुरू असताना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव या नाचगाण्यात दंग असल्याचं दिसून आले आहे.



तुळजापुरात नवरात्र महोत्सवानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमातील डान्सचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. तुळजापुरात मंदिर संस्थानकडून यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये त्यांचा डान्सचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. धारशिव जिल्ह्याला पुराचा फटका बसल्यानंतर अनेक मंत्री, अधिकाऱ्यांचे दौरे सुरू आहेत. मात्र बळीराजा हवालदिल झालेले असताना जिल्हाधिकाऱ्यांच्या कृतीमुळे त्यांच्यावर टिकेची झोड उठली आहे.

पूरग्रस्तांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार एकीकडे धाराशिवमध्ये शेत शिवारात पाणी आहे. संसार उघड्यावर पडले आहेत. पिक पुराच्या पाण्याखाली गेली आहेत, हे दृश्य डोळ्यात पाणी आणणार आहे. तर दुसरीकडे जिल्हाधिकाऱ्यांचा हा व्हिडिओ पाहिल्यानंतर पूरग्रस्तांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार असल्याची टीका होत आहे. दरम्यान, मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बीड, धाराशीव, परभणी यासारख्या जिल्ह्यांमध्ये लोकांच्या घरात पाणी घुसले आहे. हाताशी आलेले पीक वाहून गेले आहे. काही शेतातील पीक थेट पाण्याखाली गेले आहे. मराठवाड्यात साधारण १५० जनावरं दगावली. तर एकूण ८ जणांचा मृत्यू झाला. यंदाच्या खरीप हंगामात जवळपास १२०० मंडळात अतिवृष्टी झाली आहे. त्यात लाखो हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाले आहे.

# तुम्हीसुद्धा बराच वेळ मांडी घालून बसता का? तर 'या' पाच समस्यांना तुम्हीही बळी पडू शकता?

अनेकदा जेवताना, मित्रांसोबत गप्पा मारताना किंवा खुर्चीवर आरामात बसताना मांडी घालून बसल्यास आरामदायी वाटते. ही सवय अशी सामान्य मानली जाते. मात्र एका संशोधनानुसार, जास्त वेळ मांडी घालून बसल्याने शरीराला अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. या सवयीचा तुमच्या तुमच्या शरीरावर खोलवर परिणाम होऊ शकतो. तसंच हळूहळू तुमच्या पाठीचा कणा, पेल्विस स्नायू आणि रक्ताभिसरणावर परिणाम होऊ शकतो. बीएमसी स्पोर्ट्स सायन्स, मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जे लोक नियमितपणे मांडी घालून बसतात त्यांच्या कंबरेची स्थिती अतिशय कमकुवत असल्याचे आढळून आले. तसंच पबमेडमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, मांडी घालून बसल्याने पेल्विसचा झुकाव वाढतो आणि मणक्यावर दबाव पडतो. दीर्घकाळ मांडी घालून बसण्याचे तोटे काय आहेत आणि ते कमी करण्याचे मार्ग काय आहेत हे जाणून घेऊन बॅलन्स किंवा संतुलन लक्षात घेणं बापरे! उद्यापासून मंगळाचा कहर सुरु! 'या' ४ राशींच्या आयुष्यात दुःख, कष्ट, एकामागोमाग संकटं येणार? मंगळाच्या चालीनं होणार उलथापालथ! ३० वर्षानंतर 'या' राशीवर अखेर शनीची कृपा! तिजोरीत वाढेल धन, मिळेल अफाट पैसा, गाडी अन् घर; विपरीत राजयोग बदलून टाकणार आयुष्य १५ सप्टेंबरपासून पुढचे २४ दिवस नुसता पैसा; 'या' ४ राशींचं आयुष्य बदलणार, समृद्धीचा दाता 'शुक्र' खजिना देणार शरीराची पोझिशन आपली कंबर स्थिर ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. संशोधनानुसार, जे लोक दिवसातून तीन तासांपेक्षा जास्त वेळ मांडी घालून बसतात त्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होतो. अशा परिस्थितीत त्या व्यक्तीला काही कळतच नाही की त्याची पाठ सरळ आहे की वाकलेली आहे. कालांतराने त्याच्या पाठीची पोझिशनच बदलून जाते. ओटीपोट आणि असमान दबाव मांडी घालून बसल्याने शरीराचे वजन समान प्रमाणात वितरित होत नाही. त्यामुळे पेल्विसचा एक भाग उंचावतो.त्यामुळे पेल्विस तिरकस होऊ शकते. सोबतच ग्लूटियल स्नायूंवर म्हणजेच कंबरेवरील स्नायूंवर असमान दबाव पडतो. ही परिस्थिती कंबरदुखी असलेल्यांसाठी अधिक धोकादायक ठरू शकते. एवढीशी वेलची आरोग्यासाठी आहे अतिशय उपयुक्त, आहारात आवर्जून करा समावेश ठरेल फायदेशीर मणक्याच्या नैसर्गिक वक्रतेत बदल आपल्या मणक्याला लंबर लॉर्डोसिस नावाचा एक नैसर्गिक आतील वक्र असतो. बराच वेळ मांडी घालून बसल्याने हा वक्र सपाट होतो. यामुळे मणक्यावर आणि डिस्कवर जास्त दबाव पडतो. कालांतराने ही समस्या दीर्घकालीन पाठदुखीमध्ये बदलू शकते.

कंबर आणि पेल्विक स्नायूंवर ताण मांडी घालून बसल्याने पिरिफॉर्मिस हा एक लहान पण महत्त्वाचा स्नायू असामान्यपणे ताणला जातो. त्यामुळे पाठीचा कणा आणि पेल्विसला जोडणाऱ्या सॅक्रोइलियाक सांध्यावर देखील दबाव येतो. या सवयीमुळे पेल्विसच्या स्थिरतेवर परिणाम होऊ शकतो आणि तुमच्या चालण्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. कोअर बॅलन्स मांडी घातल्याने केवळ शरीराच्या खालच्या भागावरच नाही तर वरच्या भागावरही परिणाम होतो. अशा स्थितीत छातीची हालचाल कमी होते. पोटाच्या काही स्नायूंची क्रियाशीलता कमी होते. त्यामुळे धडाची स्थिरता कमी होते. दीर्घकाळ अशा अवस्थेत राहिल्यास श्वासोच्छवासाच्या क्षमतेवर आणि शरीराच्या संतुलनावर परिणाम होऊ शकतो. याव्यतिरिक्त सकाळी उठल्यानंतर काही लक्षणे दिसल्यास हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोकची शक्यता वाढते. या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते.

## पोटावर वाढलेली थुलथुलीत चरबी डाएट करून सुद्धा कमी होत नाही? मग 'या' पद्धतीने करा ताकाचे सेवन, महिनाभरात व्हाल स्लिम

जगभरात लठ्ठपणामुळे अनेक लोक त्रस्त आहेत. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक वेगवेगळे प्रयत्न केले जातात. पण आहारात होणाऱ्या चुकांमुळे आणि जीवनशैलीतील बदलांमुळे वाढलेले वजन कमी होण्याऐवजी आणखीनच वाढत जाते. शरीरावर वाढलेल्या अनावश्यक चरबीमुळे अनेक लोक त्रस्त आहेत. काहीवेळा चारचौघांमध्ये गेल्यानंतर महिलांचा आत्मविश्वास काहीसा कमी होऊन जातो. त्यामुळे वाढलेल्या वजनावर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. वजन कमी करण्यासाठी महिला तासनतास जिम करणे, डाएटमध्ये बदल, अधिक वेळ उपाशी राहणे इत्यादी अनेक गोष्टी फॉलो करतात. पण तरीसुद्धा वजनावर नियंत्रण मिळवता येत नाही. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला वाढलेल्या वजनावर नियंत्रण मिळवण्यासाठी ताकाचे सेवन कशा पद्धतीने करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. उन्हाळ्यासह इतर सर्वच ऋतूंमध्ये ताक, दही किंवा इतर थंड पदार्थांचे सेवन केले जाते. ताक प्यायल्यामुळे शरीरात थंडावा कायम टिकून राहतो. शरीरात वाढलेली उष्णता कमी करण्यासाठी ताक प्यावे. याशिवाय वाटीभर दही खाल्यास शरीर कायमच निरोगी राहील. ताक प्यायल्यामुळे ॲसिडिटी कमी होते, शरीर हायड्रेट राहते आणि शरीराला थंडावा मिळतो. यामध्ये असलेले चांगले बॅक्टरीया मेटाबॉलिझ्म सुधारण्यास मदत करतात. याशिवाय ताक प्यायल्यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात. ताक प्यायल्यानंतर वजन झपाट्याने कमी होते.

काहींब जेवणाआधी ताक पिण्याची सवय असते. ताकाचे सेवन केल्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते. जेवणात ताकाचे सेवन केल्यास शरीरातील अननपदार्थ सहज पचन होण्यास मदत होते. याशिवाय जेवणाआधी ताक प्यायल्यास पोट भरल्यासारखे वाटते. ताकामध्ये कमी कॅलरीज आणि उच्च पोषक तत्व आढळून येतात. १०० मिलीलीटर ताकामध्ये ४० ते ४५ कॅलरीज असतात. त्यामुळे उच्च कॅलरीज मिळवण्यासाठी ताक पिणे उत्तम पर्याय आहे. ताकामध्ये प्रोबायोटिक्स मोठ्या प्रमाणावर आढळून येतात, ज्यामुळे शरीराची पचनक्रिया कायमच निरोगी राहते. आतड्यांच्या आरोग्यासाठी दुपारच्या जेवणात नियमित ताक प्यावे. चयापचय सुधारल्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. वाढलेले वजन कमी करताना आहारात कोणत्याही सप्लिमेंट्सचे सेवन करण्याऐवजी ताकाचे सेवन करावे. ताक कधी आणि कसे प्यावे? कोणत्याही वेळी ताकाचे सेवन करू नये. दुपारच्या आहारात प्रामुख्याने ताकाचे सेवन केले जाते. वजन कमी करताना जेवणाआधी एक ग्लास ताक प्यायल्यास पोट जास्त वेळ भरलेले राहील आणि जेवणात कमी अन्नपदार्थांचे सेवन होईल. दुपारी जेवल्यानंतर ताकाचे सेवन केल्यास पचनक्रिया कायमच निरोगी राहील. यामुळे अन्नपदार्थ सहज पचन होतात. घरी जर तुम्ही ताक बनवत असाल तर ते पातळ असावे. ताकात जास्त मीठ घालू नये. काहींना मसाला ताक प्यायला खूप जास्त आवडते. पण वजन कमी करताना मसाल्याच्या ताकाचे अजिबात सेवन करू नये. वजन कमी करण्यासाठी आहारविषयक टिप्स: आहारात फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि प्रथिने यांचा समावेश करा. साखरयुक्त पेये, फॅटी पदार्थ आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ जास्त खाणे टाळा. दररोज पुरेसे पाणी प्या, ज्यामुळे चयापचय (metabolism) वाढतो आणि कॅलरीज बर्न होतात. लठ्ठपणा म्हणजे काय? लठ्ठपणा ही एक गंभीर आरोग्य स्थिती आहे, ज्यात शरीरात गरजेपेक्षा जास्त चरबी जमा होते. यामुळे अनेक जुनाट आजारांचा धोका वाढतो. लठ्ठपणाचे धोके आणि दुष्परिणाम? मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार.कर्करोगाचा वाढलेला धोका.बालपणातील लठ्ठपणा: यामुळे मानसिक आरोग्य समस्या (उदा. कमी आत्मविश्वास, नैराश्य) आणि सामाजिक अडचणी येऊ शकतात.

# दिव्यांग बांधवांचा हक्काचा आवाज : उमंग सेंटरमध्ये बच्चुभाऊ कडू यांचा जिव्हाळ्याचा संवाद

लातूर – समाजातील उपेक्षित, दुर्बल आणि दिव्यांग बांधवांच्या उत्थानासाठी झटणारे व्यक्तिमत्त्व म्हणजेच प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री नामदार श्री. बच्चुभाऊ कडू. त्यांच्या विशेष संवेदनशीलतेचा व सकारात्मक दृष्टिकोनाचा प्रत्यय लातूरमधील उमंग या दिव्यांग पुनर्वसन व थेरपी सेंटरला झालेल्या त्यांच्या दौऱ्यात आला. या भेटीत त्यांनी केंद्रात दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक व उपचारात्मक सेवांचा बारकाईने आढावा घेतला. ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मेंदूविकार, मानसिक व शारीरिक दिव्यांगत्व यांसारख्या गुंतागुंतीच्या अडचणींना तोंड देणाऱ्या मुलांचे निरीक्षण करताना त्यांनी ना केवळ त्यांच्या आयुष्यातील संघर्ष समजून घेतले, तर त्यांच्या पालकांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा समजून घेतल्या. पालकांच्या डोळ्यांतील अश्रू आणि मनातील आशा ओळखून, बच्चुभाऊंनी त्यांच्या अडचणींचे निवारण लवकरात लवकर करण्याचा ठोस शब्द दिला. उपस्थित डॉक्टरांकडून सुरू असलेल्या ऑक्युपेशनल, स्पीच, फिजिओ, बिहेविअर थेरपीसह विविध उपचार पद्धतींची सविस्तर माहिती घेत त्यांनी प्रत्येक उपचारपद्धतीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्राच्या कार्यपद्धतीचे भरभरून कौतुक केले. विशेष म्हणजे उमंगच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या ऑटिझम ऑन व्हील्स या पोर्टेबल व्हॅनचे निरीक्षण करताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व समाधान हा दिव्यांग बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असलेल्या त्यांच्या बांधिलकीचा पुरावा होता. या दौऱ्यात त्यांनी महत्त्वाचे संकेत देत असे स्पष्ट केले की, २१ प्रकारच्या विविध दिव्यांगत्वासाठी आवश्यक असलेल्या सुविधा एका छताखाली उपलब्ध करून देणारे 'दिव्यांग भवन' प्रत्येक जिल्ह्यात उभे राहिले पाहिजे. त्यासाठी मी स्वतः शासन दरबारी शिफारस करणार असून, एक टक्के डीपीडीसी निधी व पाच टक्के दिव्यांग निधीचा योग्य वापर होत असल्याची खात्री करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले. उमंगच्या कार्यपद्धतीची आणि समाजासाठी दिल्या जाणाऱ्या योगदानाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. उपस्थित मान्यवरांमध्ये उमंगचे सचिव श्री. किरण उटगे, व्यवस्थापक ड. श्रीहरी गोरे, डॉ. श्रीशैल्यम तलारी, श्री. गणेश डोंगरे, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. मंदिरा हौसले, डॉ. वैष्णवी सिंगन, डॉ. प्रवीण राठोड, तसेच समर्पित कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. प्रहार जनशक्ती पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष श्री. राजूभाऊ चौगुले यांचा दौऱ्यातील सहभागही उल्लेखनीय होता. या दौऱ्यामुळे लातूर जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना केवळ मानसिक बळच नव्हे, तर नवीन दिशा व नवीन वाट मिळाल्याचा विश्वास जनमानसात निर्माण झाला आहे.

# अनुसूचित जमातीच्या धर्तीवर भोई व भटक्या ब समाजाला घरकुलासह इतर सोई सुविधा मिळाव्यात

## राळेगाव तहसीलदार व गटविकास अधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन

यवतमाळ / प्रतिनिधी :– महाराष्ट्र प्रदेश भोई समाज सेवा संघाचे अध्यक्ष मारोतराव पडाळ यांचे नेतृत्वात राळेगाव तालुक्यातील भोई व भटक्या ब प्रवर्गात येणा–या सर्व समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळण्याकरीता व घरकुलाचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मा.तहसीलदार साहेब व मा.गटविकास अधिकारी साहेब राळेगाव यांचे मार्फत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले. सद्या राळेगाव तालुक्यातील भोई तथा भटक्या जमातीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा भोई समाज संघटनेच्या वतीने केलेल्या सर्वेअंती भोई तथा भटका ब प्रवर्ग अतिशय अविकसित असल्याचे निदर्शनास आले. भोई व भटक्या ब प्रवर्गात येणा–या समाजाला शैक्षणिक, आर्थिक व राजकीय आरक्षण नाही, शिक्षणामध्ये सवलती नाही, नोक–या



नाही, उद्योगधंदे नाही आणि राहायला घर नाही. त्यामुळे भोई तथा भटका ब प्रवर्गात असणारा सर्व समाज मोठ्या प्रमाणात असून तुटपुंज्या २.५ टक्के आरक्षणामुळे अविकसित आहे. त्यामुळे तालुक्यातील भोई तथा सर्व भटक्या ब प्रवर्गातील समाजाच्या वतीने मा.तहसीलदार साहेब राळेगाव यांचे मार्फत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले. तसेच राळेगाव तालुक्यातील भोई तथा भटक्या ब प्रवर्ग पंतप्रधान मोदी आवास योजना किंवा यशवंतराव चव्हाण घरकुल योजना व इतर कोणत्याही घरकुल योजनेअंतर्गत घरकुलापासून वंचित आहेत. भोई तथा भटका समाज नदी नाल्याच्या काठावर गावाच्या बाहेर राहत असून अतिशय पडक्या अवस्थेत असणा–या घरात वास्तव्य करीत आहे. पडक्या अवस्थेतील एका एका छोट्या घरात अनेक कुटुंबे एकत्र राहत असून जंगली जनावरे व नैसर्गिक आपत्तीला सामोरे जात वास्तव्य करीत असल्याने व मागील काही अनेक वर्षांपासून झाडगाव येथील भोई समाज वस्तीचे पुनर्वसन प्रलंबित आहेत. तर ते त्वरित मंजूर करून सोई सवलती मिळण्याबाबत मा गटविकास अधिकारी पंचायत समिती राळेगाव यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये प्रलंबित घरकुलाचे प्रश्न व झाडगाव येथील भोई समाज वस्तीचे पुनर्वसन त्वरीत मंजूर करावे, अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. या शिष्टमंडळात भोई समाज संघटनेचे अध्यक्ष मारोतराव पडाळ, हनुमानजी सातघरे, अशोकराव पारीसे, युवा अध्यक्ष राहुल पडाळ, सुनील पारीसे, दिनेश पारिसे, अनंता पारीसे, समीर डोंगरे, गोविंदराव बावणे, चंदाबाई पचारे व बेलदार समाजाचे अध्यक्ष श्री जयाभाऊ रागीनवार उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची ई पीक पाहणी अट रद्द करावी

## राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी

लातूर :–शेतकऱ्यांची ई पीक पाहणीची अट रद्द करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.



आधीच अतिवृष्टीने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आता ई–पीक पाहणीची जाचक अट मारत आहे. शेतात जाण्यासाठी रस्तेच नसल्याने शेतकऱ्यांनी शेतात जाऊन ई–पीक पाहणी कशी करावी हा मोठा प्रश्न पडला आहे. काही ठिकाणी रस्तेच वाहून गेले आहेत, तर काहींना जाण्यासाठी नदी नाले ओलांडून जावे लागत आहे.

बऱ्याच शेतकऱ्यांनी जीव धोक्यात घालून पिकात जाऊन केलेल्या ई–पीक पाहणीचा ओटीपीच येत नसल्याने मोठी डोकेदुखी होत आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई–पीक पाहणी केली आहे त्यालाच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मदत मिळणार तसेच हमी भावाने शेती माल खरेदी करण्यासाठी ही अट असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अतिवृष्टीत मार खाल्लेला शेतकरी आता जाचक अटीत मरण पावत आहे. ३० सप्टेंबर ही पीक पाहणी करण्याची शेवटची तारीख असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. येणाऱ्या दोन–चार दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभाग व हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर ई–पीक पाहणी कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे ही अटच रद्द करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी केली आहे

# विविध क्षेत्रातील महीलांना – नारी समाजस्य कुशलवास्तुकारा या नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित

लातूर :– आर्यावर्त – रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर आर्यावर्त व आर्यावर्त लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात वैयक्तिक कर्तव्य जबाबदाऱ्या पार पाडून, समाजिक कार्यात अद्भुत योगदान देणाऱ्या श्रीमती सुमित्रा सरुबाई रघुनाथ तोटे (आरोग्य ) यांच्यासह श्रीमती मेघा देवघाने ( ट्रॅफीक पोलीस ), कविता सावंत ( वृक्ष), अनुराधा बुड्ढे ( आशा कार्यकर्ती ), छाया कदम ( व्यायमशाळा), वैशाली सुर्यवंशी ( ग्रामसेवक ), हेमा पिनाटे ( व्यापार ), गंधाली वारद ( योग), काजोल जाधव (लघुउद्योजक) अशा महीलांना – नारी समाजस्य कुशलवास्तुकारा या नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा प्रवक्त्या प्रेरणाताई होनराव, प्रमुख वक्त्या– श्रीमती सुनिता सावंत बोरगावकर मु.अ. गोदावरी कन्या शाळा लातूर, श्रीमती रागिणी यादव – भाजपा महीला शहर अध्यक्ष लातूर, रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर चे अध्यक्ष श्री आदित्य शास्त्री,



श्रीमती लखनगावे मॅडम, संपर्क प्रमुख मेघा अग्रोया व रोटरॅक्ट क्लब लातूर चे सर्व पदाधिकारी तसेच आर्यावर्त लातूर चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# उदगीर शहरातील शरीराविषयी गुन्हे करणारे टोळीला चार जिल्ह्यातून हद्दपार करण्याबाबत पोलीस अधीक्षकांचे आदेश

लातूर :– उदगीर शहरातील शरीराविषयी गुन्हे करणारे टोळीला चार जिल्ह्यातून हद्दपार करण्याबाबत पोलीस अधीक्षकांचे आदेश

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी टोळीने गंभीर गुन्हे करणारे इसमांना लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी या चार जिल्ह्यातून सहा महिन्याकरिता हद्दपार करण्याबाबतचे आदेश काढलेले आहेत. उदगीर शहरातील इसम नामे सुमेर कलीम तांबोळी वय २८ रा. मुसा नगर उदगीर, समीर कलीम तांबोळी वय ३२ रा. मुसा नगर उदगीर, सिकंदर अजगर शेख रा. मुसा नगर उदगीर, असद खान शरीफ खान पठाण रा. मुसा नगर उदगीर

वरील इसम हे गटातील साथीदाराचे मदतीने शरीराविषयी गंभीर गुन्हे करण्याचे सवयीचे असल्याने त्याचा परिणाम सार्वजनिक शांततेवर होत असल्याने व सदर इसमांची सामान्य लोकांमध्ये दहशत निर्माण झालेली असल्याने . सदर इसमां विरुद्ध खुनाचा प्रयत्न करणे, इच्छापूर्वक जबर दुखापत करणे व शासकीय कामात अडथळा निर्माण करणे अशा प्रकारचे गंभीर गुन्हे असल्याने सदर इसमांना हद्दपार करण्याबाबतचा प्रस्ताव अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री गजानन भातलवंडे यांचे मार्गदर्शनाखाली उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांनी पोलीस अधीक्षक यांना प्रस्ताव पाठवला होता.

त्यानुसार पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी टोळीने गंभीर गुन्हे करणारे इसमांना लातूर,नांदेड, धाराशिव, परभणी या चार जिल्ह्यातून सहा महिन्याकरिता हद्दपार करण्याबाबतचे आदेश काढले आहेत. आदेशानुसार उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोउपनि श्री रवींद्र तारू व पोलिस अंमलदार सतीश पवार गजलवार यांनी सुमेर कलीम तांबोळी वय २८ रा. मुसा नगर उदगीर, समीर कलीम तांबोळी वय ३२ रा. मुसा नगर उदगीर, सिकंदर अजगर शेख रा. मुसा नगर उदगीर यांना दिनांक २५/९/२०२५ रोजी जिल्ह्याच्या बाहेर नेऊन सोडलेले आहे व उर्वरित एक आरोपीस नोटीस बजावण्यात आलेली आहे. वरील नमूद इसम हे परत लातूर परभणी, नांदेड, धाराशिव या जिल्ह्यात आढळून आल्यास त्वरित पोलिसांना कळवावे.

भविष्यात सार्वजनिक शांतता धोक्यात आणणारे व दहशत निर्माण करणारे व शरीराविषयी गुन्हे करणारे इसमाचे बाबतीत अशाच प्रकारची निरंतर कारवाई सुरू राहणार आहे

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन च्या वतीने १३५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर २०२५ ला दुपारी २:३० वाजता, संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर (पेठे नगर), भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे पक्षाच्या व जातीच्या हार्दिक सहकार्यानेच राजकीय पेच सुटतील. तसेच सार्वजनिक पैशाचा अपहार करण्यासारखे नीच कृत्य दुसरे नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८१ व्या व ७३ व्या वर्धापनदिनानिमित्त १३५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेला आंबेडकरी चळवळीचे समाजसेवक सिद्धार्थ गंगावणे हे उद्घाटनर मार्गदर्शन करणार आहेत तर सामाजिक कार्यकर्ते डॉ. रमेशचंद्र धनेगावकर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. करिता ९४२१६७८६२८, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८ या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते जाणून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# युवकांनी आपले आदर्श कोण तपासा आणि कष्टला प्रयत्नाची जोड द्या तुम्हीच तुमच्या यशाचे शिल्पकार व्हाल : प्रा. डॉ. प्रीती शिंदे

मुरुम / प्रतिनिधी :– आजची पिढी आपला हिरो किवा आदर्श कोणाला मानतात हे कळतच नाही. त्यासाठी आपले आदर्श कोण हे तपासायला पाहिजे. तरच कष्ट करायची जाणीव होईल. आणि त्या कष्टाला सरावाची आणि प्रयत्नाची जोड दिली तरच युवक स्वतःच स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार बनतील. प्रचंड कष्ट करण्याची तयारी, प्रयत्नातील सातत्य आणि वाचनाचा सराव हे चार आधारस्तंभ युवकांना स्वतःच त्यांचे जीवन घडवण्यासाठी शिल्पकार म्हणून तयार करतील असे मत वारणानगर येथील प्रा. डॉ. प्रीती शिंदे यांनी व्यक्त केले. शनिवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित कर्मयोगी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्पगुंफताना त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. सुभाषराव वाघमोडे होते. प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव याची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. प्रीती शिंदे म्हणाल्या की जीवन सुंदर आहे आणि ते अधिक सुंदर घडविण्यासाठी युवकांना स्वतःला शिल्पकाराची भूमिका पार



पाडावी लागेल, त्यासाठी प्रचंड कष्टाची तयारी ठेवून प्रयत्नातील सातत्य हेच तुम्हाला ध्येय सिद्धी पर्यंत पोहचवू शकतात. कष्टाच्या घामाने आंघोळ करणारा माणूस स्वतःचे जीवन घडवू शकतो. अध्यक्षिय समारोप करताना डॉ. सुभाष वाघमोडे यांनी समाज परिवर्तनासाठी वैचारिक प्रबोधनाची गरज यावेळी त्यांनी व्यक्त केली. उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ. अशोक पदमपल्ले, शहरातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज ईटले यांनी केले तर डॉ. डी. बी. ढोबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# राज्यात पावसाने हाहाकार, मराठवाडा–विदर्भाचा संपर्क तुटला

मुंबई : दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा पावसाने थैमान घातले आहे. नांदेड, हिंगोली, धाराशिव, लातूरमध्ये पुन्हा एकदा पावसाने वादळी वा–यासह हजेरी लावली आहे. आधीच्याच पावसामुळे शेतकरीराजा संकटात सापडला होता. त्यात आता पुन्हा एकदा पावसाने हाहाकार माजवला आहे. मुसळधार पावसामुळे विदर्भ आणि मराठवाड्याचा संपर्क तुटला आहे.

मुसळधार पावसामुळे पैनगंगा नदीच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी हिंगोली–पुसद हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. हिंगोलीच्या कळमनुरी तालुक्यातील माळेगाव परिसरात पूर परिस्थितीमुळे शेतक–यांसह वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक वाहने रस्त्यावर अडकून पडली आहेत. दुसरीकडे लातूर जिल्ह्यातील मन्याड नदीच्या पाणी पातळीतही मोठी वाढ झाली आहे. शेणकुडमधील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. चार जिल्ह्यांत शाळांना सुटी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुढील ४८ तास राज्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे मराठवाड्यातील चार जिल्ह्यांत शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. लातूर, धाराशिव, हिंगोली आणि नांदेडमध्ये शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिका–यांनी खबरदारी म्हणून जिल्ह्यातील सर्व शाळा, कॉलेजला सुटी जाहीर केली आहे. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर आज पुन्हा एकदा पावसाने हाहाकार माजवला आहे. पुढील दोन दिवस राज्यात अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# भविष्य दिवाळी अंक प्रकाशित येणारे उत्पन्न पूरग्रस्तांसाठी देणार

पुणे ; गेली १४ वर्षे विजयादशमीच्या मुहूर्तावर प्रकाशित होत असलेल्या भविष्य दिवाळी अंकाचे प्रकाशन नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी इंडियन बँक आणि आयडीबीआय बँकेचे माजी एमडी आणि सीईओ श्री. किशोर खरात यांच्या हस्ते करण्यात आले. हा अंक आता विक्रीसाठी उपलब्ध आहे. या प्रकाशन समारंभाला प्रथमेश फायनान्स चे मनोज भालेराव आणि केबल व्यावसायिक सुनील ननावरे उपस्थित होते.



विविध विषयांवर या अंकात सखोल माहिती देण्याची परंपरा असून सेवा म्हणून या अंकाची निर्मिती भक्ती प्रकाशन संस्थेच्या वतीने करण्यात येते. यंदाच्या अंकात वैवाहिक समस्या, पूजापाठाचे महत्त्व, उच्च शिक्षण आणि योग, पुन्हा एकत्र कुटुंब पद्धतीकडे वाटचाल, नक्षत्रांचा अभ्यास या विषयांवर लेखन आहे. राजकीय विषयावर सविस्तर विवेचन असून बिहारमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीचे राष्ट्रीय पातळीवर होणारे परिणाम, गांधी घराणे आणि काँग्रेसचे आगामी राजकारण, डोनाल्ड ट्रंप यांच्या डावपेचांचा परिणाम आणि जागतिक पातळीवर निर्माण झालेली अस्वस्थता यावर अभ्यासपूर्ण लेखन आहे.

भविष्य दिवाळी अंकाची विक्री आणि जाहिरातीतून मिळणारे उत्पन्न याचा विनियोग प्रथमपासूनच गरजू विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर मदत करण्यासाठी केला जातो. या वर्षी राज्यावर अस्मानी पावसाचे मोठे संकट आले आहे. या काळात सामाजिक कर्तव्य म्हणून या अंकातून मिळणारे उत्पन्न पूरग्रस्तांना मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री निधीत जमा करण्यात येणार आहे असे या अंकाचे प्रकाशक आणि संपादक स्वामी विजयकुमार यांनी सांगितले.

# ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंच्या गाडीवर हल्ला; अहिल्यानगरमधील सभेपूर्वी घडली घटना

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील दैत्यनांदूर येथे ओबीसी समाजासाठी आयोजित मेळाव्यासाठी ते आले होते. ते अहिल्यानगरच्या दिशेने रवाना झाले, मात्र त्यापूर्वी त्यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला असून, या हल्ल्यात त्यांच्या गाडीच्या काचा फुटल्या आहेत. या हल्ल्यात लक्ष्मण हाके यांना काही झालेलं नाही. पण मोठ्या प्रमाणात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगरजवळ असलेल्या आरनगाव बाह्यवळण रस्त्यावर लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर अज्ञात तरुणांनी हल्ला केला. आज पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर येथे ओबीसी एल्गार सभेसाठी लक्ष्मण हाके जात होते. त्यावेळी त्यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला. दुपारी दोन वाजता त्यांची सभा होणार आहे. यामुळे ही सभा होणार की नाही याबाबत माहिती समजू शकलेली नाही. नेमकी घटना कशी घडली? पुण्याहून लक्ष्मण हाके सभेसाठी पाथर्डी येथे चालले होते. तेव्हाच मध्येच रस्त्यावर हल्ला झाल्याच त्यांच्या सहकाऱ्याने सांगितले. हल्ला करणारे कोण होते याची माहिती मिळू शकलेली नाही. पोलिसांकडून हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे. ओबीसी समाज्याच्या विविध मागण्यांसाठी लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. काल त्यांनी एक भावनिक फेसबुक पोस्ट केली होती. त्यानंतर आज त्यांच्या गाडीवर हल्ला झाला आहे. या हल्ल्यात गाडीचे नुकसान झाले आहे. यामुळे या हल्ल्यामागे कोण आहे याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE